# मिरा भाईंदर महानगरपालिका
# माहिती व जनसंपर्क विभाग
# प्रेसनोट

## ❖ निती आयोगामार्फत, महिला उद्यम मंचाच्या फराळ सखी – अवॉर्ड टू रिवॉर्ड उपक्रम, महिलांच्या व्यावसायिक प्रशिक्षण शिबिराला सुरुवात

मिरा भाईंदर महापालिकेने दिवाळीत राबविलेल्या फराळ सखी उपक्रमाला केंद्र शासनाच्या निती आयोगाची मान्यता मिळाली असून नुकतेच २ जानेवारी २०२५ रोजी महिला उद्यम मंचाद्वारे फराळ सखी - अवॉर्ड टू रिवॉर्ड या उपक्रमाचे अनावरण झाले. या उपक्रमांतर्गत फराळ सखीसाठी निवड झालेल्या २५ महिलांना व्यवसाय प्रशिक्षण शिबिरास गुरुवार दिनांक ९ जानेवारी २०२५ रोजी सुरुवात झाली आहे.

मिरा भाईंदर महापालिकेचे आयुक्त तथा प्रशासक संजय श्रीपतराव काटकर (भा.प्र.से) शहराच्या विकासासाठी नेहमी नावीन्यपूर्ण संकल्पना राबवत असतात. महिलांना कायमस्वरूपी उद्योग, रोजगार आणि बाजारपेठ मिळावी यासाठी माननीय आयुक्त यांच्या संकल्पनेतून ‘फराळ सखी’ हा उपक्रम राबविण्यात आला होता. या उपक्रमांतर्गत महिलांना व्यवसायिक पद्धतीने फराळ बनवून त्याची विक्री करण्यासाठी महापालिकेने स्वतंत्र यंत्रणा उभारली होती. या उपक्रमाला नागरिकांनी उदंड प्रतिसाद दिला, महिलांनी तब्बल ३ टन खाद्यपदार्थांची विक्री केली होती.

फराळ सखी उपक्रमाला निती आयोगाची मान्यता मिळाली आहे. नीती आयोगाच्या महिला उद्यम मंचातंर्गत अवॉर्ड टू रिवॉर्ड उपक्रमांतर्गत पुढील टप्प्यातील प्रशिक्षण देण्यात येत आहे. यासाठी २५ महिलांची शास्त्रोक्त निकषांअंती निवड करून त्यांना व्यावसायिक प्रशिक्षण देण्यात येत आहे. ९ जानेवारीपासून व्यवसाय व्यवस्थापन, मार्केटींग-ब्रँडिंग, पैशांचे व्यवस्थापन, गुंतवणूक, व्यावसायिक कर्ज, अन्न-पदार्थ व्यवसायातील कायदे, पॅकेजिंग, वितरण आदी विषयांवर चार दिवसीय प्रशिक्षण देण्यात येत आहे. या प्रशिक्षणामुळे महिलांना व्यवसाय कसा करावा, त्याची गुणवत्ता कशी वाढवावी हे समजणार असून, भविष्यात फराळ सखी हा ब्रँड बनेल त्यातून या महिला उद्योजक म्हणून ओळखले जातील,असा विश्वास मनपा आयुक्त तथा प्रशासक संजय श्रीपतराव काटकर (भा.प्र.से) यांनी व्यक्त केला आहे.